# मर्डर फॉर डायमंड्स

लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 275

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

मर्डर्स फॉर डायमंडस्  : मधुकर हुद्दार
© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१३

**किंमत**
₹ १८०/-

# मर्डर फॉर डायमंड्स

# १

''आजच्या गुन्हेगारी विश्वात व्यसनाधीनता, स्त्री व पैसा, अपरंपार धनसंपत्ती गोळा करून सुखी वैभवशाली जीवन जगण्याची आकांक्षा, या मानसिक विकृतीतून जन्माला आलेले गुन्हे घडताना दिसतात. 'रम-रमा-रमी'ही त्रिकोण म्हणजे गुन्हेगारीची सीमा.

माणूस जन्माला येतो तेव्हा, मूल गर्भजन्य संस्कार बीज अंगीकारूनच पृथ्वीवर पदार्पण करतो. बालपणापासूनच चांगले संस्कार लाभले तर माणूस सभ्य, सुसंस्कृत होतो; पण असं घडतंच असं नाही. चांगल्या संस्कारातील माणसंसुद्धा मोहाला बळी पडून गुन्हेगारीकडे वळतात, फक्त अशांचं प्रमाण कमी असतं. परंतु गुन्हेगारी प्रवृत्ती जन्मजात असली, तर अनुकूल अशा वातावरणाची निर्मिती होताच, ही कुप्रवृत्ती बळावते नि माणूस अगर स्त्री गुन्हेगार बनते.

मोहाला बळी न पडणं शक्य झालं नाही, तर हातून गुन्हा घडतोच. कुठलेही कष्ट न करता लक्षावधी रुपये पदरी पडत गेले, तर पैशाची चटक लागतेच. बरेचदा दारिद्र्य, बेरोजगारी व पोटाची अन् शरीराची भूक या गुन्ह्यांच्या मुळाशी असते. याचा अर्थ दरिद्री लोक गुन्हेगार असतातच असं नव्हे. अंग मेहनत करून पोटापुरतं ते कमावतात व सुखानं जगतात. पण आळशी, गुंडप्रवृत्तीचे, कष्टाला बगल देऊन सहजप्राप्त धन जर गुन्हेगारीत मिळत असेल तर, काय हरकत आहे? असा अविचार करणारे लोक भविष्यात गुन्हेगार होतात. अंडरवर्ल्डमधील लोक अब्जपती असतात, तरीही अन्य देशात बॉम्ब स्फोटासारखे गुन्हे घडवून ते काय मिळवतात? अमेरिका जगातील सर्वाधिक श्रीमंत राष्ट्र, लोकसंख्या कमी,

भूमिविस्तार प्रचंड पण अणुशक्तीचा शोध लागताच, तिचा उपयोग सृजनात्मक न करता, हिरोशिमा व नागासाकीची राख. अणुबॉम्ब बनवून व त्याचा बलप्रयोग अमेरिकेनं का केला? उत्तर साधं आहे. जगातील सर्वशक्तिमान राष्ट्र होण्याची अतिरेकी अभिलाषा, हेच प्रबल कारण या गुन्ह्याच्या मुळाशी होतं.

थोडक्यात काय? तर काम, क्रोध, मोह, मत्सर, मद, लोभ हे षडरिपू यापैकी एक किंवा अधिक प्रत्येक गुन्ह्याच्या मुळाशी असतात. आपला संसार हा असा आहे. चांगला-वाईट, उत्तम-निकृष्ट सर्वच आपण बघतो. रोजच्या जीवनात अनुभवतो. पण आपण? आपल्या प्रवृत्तीप्रमाणेच वागत असतो...''

कालच्या रविवारी मी व एन दोघेही चर्चमध्ये गेलो असताना, धर्मगुरुंचं हे प्रवचन मी ऐकलं होतं, त्याचा सार हेच होतं. माझी बायको एन मन लावून सर्व सदुपदेश ऐकत होती. ती आपल्या गरिबीच्या पण माझ्या कष्टाळू संसारात सुखी आहे. माझ्यावर तिचं मनापासून प्रेम आहे. या प्रेमाला भाग जाऊ नये, नाहीतर हातचं उरलं शून्य, असं व्हायचं, हा विचार सतत तिच्या मनात रुंजी घालतोच. परिणामत: ती मला कधी दुखवीत नाही. माझ्या आवडी-निवडी ती पूर्ण करते. पण संधी मिळताच ती मला म्हणतेसुद्धा,

''हॅरी, रात्री अपरात्री घरी येताना कुठल्याही मुलीला लिफ्ट द्यायची नाही. अर्थात परगावाहून येताना. कारण त्यात धोका असतो. कोण कसं असतं हे कसं सांगायचं? नाही का? मी आपली सहज सांगतेय. नाहीतर तुला वाटायचं की माझ्या मनात तुझ्याबद्दल संशय आहे.''

''छे. मला असं कधीच वाटत नाही. बायकोनं थोडं तरी संशयी असायलाच हवं. त्यामुळे नवऱ्यावर वचक राहतो. नवरा काबूत ठेवणारी ही एक न दिसणारी नकेल असते.'' मला तिच्या या साध्या भोळ्या स्वभावाचं कौतुक वाटतं. मीसुद्धा ही पथ्य पाळतो. कुठल्याही प्रसंगी मी कुणाला सहसा लिफ्ट देत नाही. तरुण किंवा वयस्क स्त्रीला तर नाहीच. कशाला ही झंजट? मी एक मोटार मेकॅनिक. सैन्यात असताना मी हेच काम करीत असे. त्यामुळे खटारा ते कार, अशी कोणतीही गाडी हमखास दुरुस्त करण्याचा मला भरपूर अनुभव मिळाला. सैन्यातून बाहेर पडल्यावर मी स्वत:चं गॅरेज सुरू केलं.

पोटापाण्यापुरतं मिळतं; पण आपलं मोठं गॅरेज असावं. काचेची दारं असलेल्या पॉश ऑफिसात आपण बसावं. हाताखाली निष्णात मेकॅनिक्स असावे,

नि एक पेट्रोल पंप जोडीला असावा, हे माझं स्वप्न आहे. पण त्यासाठी लागणारा पैसा खूप हवा. आणायचा कुठून? ठीकाय. जे चाललंय ते वाईट नाही. उगाच लंगड्या पायानं एव्हरेस्ट चढण्याचे हवेतले किल्ले बांधायचे कशाला?

मी आपला मिनी ट्रक चालवत विचारत करीत होतो. बोलणार कुणाशी? वेळ रात्रीची होती. घनदाट अंधाराला चिरा देत गाडीचे हेड लाईटस् मला रस्ता दाखवीत होते. एका परगावच्या जुन्या ग्राहकांची गाडी महाप्रयासानं दुरुस्त करून थकलेला अन् भुकेला मी, घरी परतायला निघालो होतो.

मध्यरात्रीच्या वेळी जंगलातून प्रवास करताना एकटेपणा खूपच त्रासदायक वाटतो. मी अशाच थकलेल्या अवस्थेत मनाला गुंतवून ठेवण्यासाठी पोप ते पोट व्यवसाय असा विचार करण्यात मग्न होतो.

माझा रस्ता डोंगर चढून वळणं घेत पुढे नेणारा होता. अशाच एका वळणावर मी ट्रक वळवला अन् मला कचकचून ब्रेक दाबावा लागला. समोर एक १९३९ ची ब्यूक रोड मास्टर कार उभी होती. या ब्यूकला पाठ टेकवून एक तरुणी उदास चेहऱ्याने उभी असलेली दिसली. ट्रकच्या हेड लाईटचा प्रकाशझोत थेट तिच्यावर, स्टेजवर लावतात तशा स्पॉट लाईट सारखा, पडला होता. फोकस झाला होता. ब्यूकची कंडिशन मला सहन होण्यासारखी नव्हती. बरेच महिन्यांत ती धुतली गेली नव्हती अन् सर्व्हिसिंग करून बरीच वर्षं झाली असावी, असं ब्यूकचं रूप होतं.

ती तरुणी याच्या उलट स्वरूपाची मला वाटावी. तिनं भुरकट रंगाचा स्कर्ट घातला होता. त्याला शोभेल असं शीपचं जॅकेट तिच्या अंगावर होतं. झीप खाली ओढलेली होती. अन् दिसायला ती खरोखरीच सुंदर होती. अनुपमेय लावण्य म्हणतात तशी! क्षणभर मी तिच्याकडे पाहातच राहिलो.

आपला हात हलवून तिनं मला थांबण्याचा इशारा केला. तिची ब्यूक अर्धा रस्ता अडवून उभी होती. त्यामुळे मला थांबावचं लागलं. माझं तत्त्व मला 'थांबू नकोस' असं बजावत होतं; पण डॅशबोर्डाच्या घड्याळात ११.४० वाजले होते. रात्र अंधारलेली होती. प्रदेश डोंगराळ व जंगल दाट होतं. अशा स्थितीत माझी माणुसकी उफाळून आली. अशा अडचणीच्या वेळी तिला डावलून पुढे जाणं, मला शोभलं नसतं.

मी विचार केला-हिची कार बिघडली असावी. सहज दुरुस्ती होण्यासारखी असेल तर करून द्यावी. टूलबॉक्स जवळ होतीच. मी नार्थेल्ट एअर फिल्टपासून

एका मैलावर बिघडून पडलेल्या एका कारशी, दोन तास झटपट करून दुरुस्ती झाल्यावर, थकलेल्या अवस्थेत परत येत होतो. आता ही बला! माझ्यातला मेकॅनिक व माणुसकीचा धर्म जागा झाला अन् मी खाली उतरलो. मी जवळ येऊन म्हणाली,

''मला तुमची मदत हवी आहे. प्लीज.''

''काय झालंय?''

''माझ्या कारमध्ये अचानक बिघाड झालाय. अन् मला यातलं काही कळत नाही.''

''असं असेल तर अशा रात्री एकट्या का निघाल्या?''

''मला परत जाणं आवश्यक आहे म्हणून.''

''ठीकाय पाहतो. मामुली बिघाड असेल, तर काम झटपट होईल.''

मी ब्यूकचं बॉनेट वर उचलताच काहीतरी जळाल्याचा एक विशिष्ट वास माझ्या नाकात शिरला. टॉर्चच्या उजेडात मी तपासणी केली. इंजिन पाहिलं अन् बॉनेट खाली आपटला.

''इग्निशन जळलं आहे. सर्व दुरुस्ती व्हायला किमान दोन दिवस लागतील. सो. व्हॉट?''

''पण इंजिनमधला फॉल्ट इतक्या लवकर कसा काय लक्षात आला तुमच्या.''

''डॉक्टरला कसं कळतं पेशंटला काय झालंय ते? तसंच मला लक्षात आलं.''

''मी समजले नाही.''

''मी एक ट्रेन्ड अन् अनुभवी मोटार मॅकेनिक आहे. मी नुसत्या नजरेनं सुद्धा दोष ओळखू शकतो.''

हे ऐकल्यावर तिनं आश्चर्यानं माझ्या मिनी ट्रककडे पाहिलं. पाटीवर लिहिलं होतं–

हॅरी कॉलीन्स लिमिटेड.

मोटार इंजिनिअर्स

१४, इगल स्ट्रीट–डब्ल्यू.

तिनं पुटपुटत लाल रंगात लिहिलेला बोर्ड वाचला अन् जीव भांड्यात पडल्यासारखा चेहरा करून तिनं मला विचारलं,

‘‘तुमचा योगायोगावर विश्वास आहे?’’

‘‘आहेना. पण का?’’

‘‘कारण माझी कार बिघडायला अन् नेमकं मेकॅनिकशी गाठ पडायला एकच वेळ साधली.’’

‘‘हे खरंय.’’

‘‘तशी मी भाग्यवान आहेच. हव्या त्या व्यक्तीशीच माझी गाठ पडते. या उलट असतं तर एखाद्या बदमाशाशी गाठ पडली असती अन्...’’

‘‘पुढचं सांगू नका. मी कल्पना करू शकतो. आता काय करायचं? तुमची काय इच्छा आहे? मी ही कार टो करून, जवळ गॅरेज असल्यास तिथंपर्यंत सोडू शकतो.’’

‘‘यावेळी गॅरेज उघडं राहणं शक्य नाही. ही कार, माझ्या एका मित्राची आहे. तो इथून नेण्याची सोय करेल. मी वेस्टएन्डमध्ये राहते. कृपया मला तिथंवर, लिफ्ट देऊ शकाल?’’

मी विचारात पडलो. हो म्हणू की नाही म्हणू? अशा अपरात्री एका तरुण नि एकट्या मुलीला या जंगलात सोडून पुढे निघून जाणं, माझ्या माणुसकीच्या स्वभावधर्मात बसत नव्हतं. मी बोलून गेलो,

‘‘मला काही हरकत नाही. ॲज यू विश.’’

‘‘पण ही कार अशी सोडून जाणं म्हणजे अपघाताला निमंत्रण. ही बाजूला करायला हवी.’’

‘‘किती विचार करता?’’

‘‘नाही. प्रश्न विचाराचाच आहे मॅडम. अविचारानं वागलं, की नंतर पश्चात्ताप होतो. मी एक काम करतो.’’ असं म्हणून मी माझ्या ट्रकवर लटकत असलेला कंदील काढून त्या ब्यूकच्या सडकेकडील भागाला टांगून दिला. आता मी निश्चिंत झालो. पण ती म्हणाली,

‘‘आता हा कंदील तुम्हाला परत मिळायचा नाही.’’

‘‘मिळाला नाही तरी चालेल. दुसरा कंदील याची जागा घेईल; पण यामुळे निदान अपघात नि काही जणांचा मृत्यू तर टळेल?’’

‘‘हे खरंय. तुम्ही किती सहृदय अन् विचारी आहात! तुमच्यासारखे सगळे नसतात.’’

''जग हे स्वार्थी असतं. आपलं पोट भरलं ना? झालं तर. दुसरा मरेना का उपाशी?''

''चला आता.'' असं म्हणून ती ट्रकमध्ये माझ्या बाजूच्या सीटवर जाऊन बसली. वळसा घेऊन मी ड्रायव्हिंग सीटवर बसलो अन् ट्रक पुढे हाणला.

मी या तरुणीला हेडलाईनच्या उजेडात पाहिली होती. आता ती शेजारीच बसली होती. पुरेसा उजेड नसला तरी डॅशबोर्डच्या उजेडात ती उजवा पाय डाव्या पायावर ठेवून बसल्यामुळे मंद उजेडात ती सुंदर आहे याची खात्री पटली. तिचे गडद रंगाचे केस कुरळे होते. केस खांद्यापर्यंत अन् मानेकडे कुरळी घेऊन होते. तिच्या सौंदर्याची एकूण कल्पना मला आली. ती मात्र नाकासमोर सरळ रेषेत पुढचा रस्ता बघत होती.

''हा ट्रक तुमचा आहे?'' तिनं विचारलं अन् एक सिगारेट मला दिली.

''आणि धंदा सुद्धा?'' आगपेटीच्या काडीला उजळून माझी सिगारेट पेटवून तिनं विचारलं. पेटत्या काडीच्या उजेडात तिचा चेहरा बघावा असं मला वाटलं, मी नजर वळवणार एवढ्यात एक ट्रक माझ्या बाजूनं पुढे गेला. त्यामुळे मला रस्त्याकडे नजर सरळ ठेवावी लागली.

''याचा अर्थ तुम्ही हॅरी कॉलीन्स आहात.''

''होय.''

''माझं नाव ग्लोरिया सेल्बी आहे.'' ती म्हणाली. काही वेळ आम्ही दोघेही मौन होतो. नंतर तिनं चौकशीचं सत्र अन् सूत्र पुढे ताणत विचारलं,

''तुम्ही नेहमीच इतक्या लांब दुरुस्तीच्या कामाला जाता?''

''म्हणजे काय? कशावरून म्हणता?''

''तुमच्या काळ्या तेलकट हातावरून मला वाटलं.''

''तुमचा अंदाज, तर्क, अनुमान अगदी बरोबर आहे. त्याचं काय आहे, माझे काही जुने क्लायन्टस्, जवळ एखादं गॅरेज असलं तरीही, मलाच बोलावतात. त्यांना माझं काम आवडतं, अशा वेळी नाही म्हणवत नाही. मग जातो असा सोळा मैल परेड करीत. मनं जपावी लागतात मॅडम!''

''तुम्ही पुरुषांची मनं जपता. त्यांच्या भावनांचा आदर करता. मग स्त्रियांच्या भावना तर तुम्ही चांगल्याच आदरणीय मनात असाल?''

''मी स्त्रियांचा आदर करतो. तुम्हाला लिफ्ट दिली यावरून नाही का लक्षात आलं?''